# ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र राज्य

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, बेलापूर नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्रमांक -०२२-२७५६०३११ ई - मेल directoriayruralhousing@gmail.com


जा.क्र. राज्य योजना/पीडीयु /2597 /२०१८ दिनांक : १४.११.२०१८

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद (सर्व)

विषय : पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत.

संदर्भ : मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी जिल्हानिहाय आढावा बैठकीदरम्यान दिलेल्या सूचना.

महोदय,

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी जिल्हानिहाय विविध योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात घेतलेल्या बैठकीदरम्यान, प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत कायमस्वरुपी प्रतिक्षायादी (PWL) मधील घरकुल पात्र परंतु स्वतःची जागा नसलेल्या शिल्लक लाभार्थ्यांस पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत लाभ देणेबाबत सूचित केले आहे.

पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने जागा नसलेल्या लाभार्थ्यांची माहिती राज्यस्तरावर संकलित करणे आवश्यक आहे. यास्तव आपण सोबत दिलेल्या प्रपत्र-अ व प्रपत्र-ब मध्ये माहिती भरुन दि. २०.११.२०१८ पर्यंत या कार्यालयास सादर करावी, ही विनंती.

सदरील माहिती भरणेसाठी rhumaharashtra.blogspot.in वर लिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर ब्लॉगस्पॉटवर माहिती भरावी तसेच माहितीची स्वाक्षरीत प्रत या कार्यालयास ई-मेलद्वारे पाठविण्यात यावी.

सोबत : प्रपत्र अ व ब

धनंजय माळी (भा.रा.से.)
संचालक

प्रत :
१) मा. सचिव, ग्रामविकास, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर
२) उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व), यांना माहितीसाठी
३) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत पात्र लाभधारकांची माहिती

### प्रपत्र-अ

| अ.क्र. | बाब | लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| अ. | सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ नुसार, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणसाठी पात्र लाभार्थी | |
| ब. | पैकी मयत, परागंदा, पक्के घर यासारख्या बाबींमुळे अपात्र झालेले लाभार्थी | |
| क. | प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीणसाठी निव्वळ पात्र लाभार्थी | |

## पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत पात्र लाभधारकांची माहिती

### प्रपत्र-ब

| अ.क्र. | बाब | अ.जा. | अ.ज. | अल्पसंख्याक | इतर | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | निव्वळ पात्र लाभार्थी संख्या (क) | | | | | |
| २. | पैकी सन २०१६-१७, २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये घरकुल लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या | | | | | |
| ३. | शिल्लक लाभार्थ्यांची संख्या (१-२) | | | | | |
| ४. | शिल्लक लाभार्थ्यांपैकी घरकुलासाठी स्वत:ची जागा असलेल्या लाभार्थ्यांची संख्या (अ.क्र. ३ पैकी) | | | | | |
| ५. | शिल्लक लाभार्थ्यांपैकी घरकुलासाठी स्वत:ची जागा नसलेल्या लाभार्थ्यांची संख्या (अ.क्र. ३ पैकी) | | | | | |
| ६. | वरील (५) पैकी<br>(अ) पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत प्राप्त जागेत घरकुल बांधण्यास तयार असलेल्या लाभार्थ्यांची संख्या. | | | | | |
| | (ब) गट स्वरुपात (Cluster) घरकुले बांधण्यास तयार असणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या | | | | | |
| | (क) एक मजली (G+१) व दोन मजली (G+२) घरकुल बांधण्यास तयार असणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या | | | | | |